**MHRG120003202021**

<u>नियमित दिवाणी दावा क्र.२५/२०२१</u>

विलास लक्ष्मण पालवणकर
वि.
सुधीर लक्ष्मण पालवणकर वगैरे १

## निशाणी क्र. ५६ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दिला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिदाव्यातील कलम ३० मधील 'अ' या कलमातील विनंतीमध्ये 'प्रतिवादी' या शब्दाऐवजी 'वादी' अशी टंकलिखीत चुक झालेली आहे. सदर चुक दुरुस्त करण्यासाठी प्रतिदाव्यात बदल करण्याची परवानगी देण्यात यावी अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

२. वादींतर्फे प्रतिवादीच्या अर्जावर म्हणणे दाखल करण्यात आले असून त्यांनी अर्जास जोरदार हरकत असल्याचे नमूद केले आहे. वादींचे कथनानुसार या स्टेजला अर्ज देता येणार नाही कारण प्रतिवादी हा वादी–प्रतिवादी बदल करु इच्छीतो. सबब प्रतिवादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

३. उभयपक्षाचा युक्तीवाद ऐकला.

४. दावा व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत दावा ठरावाकरिता व निरंतर ताकिदीकरिता दाखल करण्यात आला असून प्रतिवादीने निशाणी क्र.१६ कडे लेखी कैफियत व प्रतिदावा सादर केला आहे. प्रतिदाव्यात प्रतिवादीने परिच्छेद ३० विनंती कलम अ) मध्ये 'वाटणीपत्राप्रमाणे दावा मिळकतीतील **वादी** यांच्या मालकीची उत्तरेकडील ०–२६–२५ हे.आर. ही मिळकत **वादी** यांच्या ताबेकब्जात वहिवाटीत आहे असा ठराव करुन मिळावा' असे नमूद केले आहे. प्रतिदावा हा कैफियतमध्येच नमूद केला असल्याने मूळ दाव्यातील वादी प्रतिवादी हे संबोधन

प्रतिदाव्यासाठी सुध्दा तसेच वाचणे आवश्यक आहे. प्रतिदाव्यातील इतर विनंती कलमांमध्ये प्रतिवादी त्याचे हक्कात मागणी करत असल्याने विनंती कलम अ मध्ये उपरोक्त नमूद ठळक **वादी** हा शब्द संगणकीय चुकीने नमूद झाल्याचे दिसून येत असून तेथे **प्रतिवादी** हा शब्द असणे आवश्यकत आहे. सदर बदल केल्यास वादीच्या दाव्यावर त्याचा काहीएक परिणाम होत नाही कारण वादीने दाव्याच्या कलम ३ मध्ये प्रतिवादी क्र.१ याला उत्तरेकडील ०–२६–२५ हे.आर. क्षेत्र मिळालेले असून सदर जमिन मिळकत आपापले ताब्यात ठेवली असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे अर्जात मागणी केलेली तारखेची प्रस्तावित दुरुस्तीस परवानगी दिल्यास वादीच्या हक्कांना बाधा येणार नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी दिल्यास प्रतिदाव्याचे स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. करीता प्रतिवादींचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या मतास मी पोहोचलो आहे. त्याचवेळी दाव्याच्या सुनावणीस झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादींनी वादीला रू.५००/– रुपये खर्च देणे आवश्यक आहे. करीता मी खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. प्रतिवादींनी वादीला रू.५००/–(रु.पाचशे मात्र) खर्च देण्याच्या अटीवर अर्ज निशाणी क्र.५६ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसांच्या आत प्रतिदाव्यामध्ये प्रस्तावित दुरुस्ती करावी व दुरुस्ती प्रतिदावा सादर करावा.

GHANSHAM RAMLAL TIWARI
Digitally signed by GHANSHAM RAMLAL TIWARI
Date: 2025.11.07 11:44:12 +0530

(घनःशाम रा.तिवारी)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड

दिनांक : ०६–११–२०२५